# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि.वि/११६५ दिनांकः—१२/०२/२०२१

## पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात वाढविण्यात आलेल्या जास्तीच्या २०% जागावरील प्रवेशाबाबत

## अधिसुचना

सर्व संबंधित विद्यार्थी, पालक व विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांना या अधिसुचनेद्वारे सुचित करण्यांत येते की, विद्यापीठाच्या पदवी स्तरावरील अभ्यासक्रमाचे घोषित निकालानुसार मोठया प्रमाणात विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्या मानाने पदव्युत्तर स्तरावरील काही अभ्यासक्रमांच्या जागा अपूऱ्या पडल्यामुळे बरेचशे विद्यार्थी पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेश घेण्यापासून वंचित राहील्याचे विद्यार्थी संघटना तसेच प्रत्यक्ष विद्यार्थ्या मार्फत निदर्शनास आले आहे. सदर वस्तुस्थिती विचारात घेता विद्यापीठाच्या विद्या परिषदेद्वारे दि. ९ फेब्रुवारी २०२१ रोजी संपन्न झालेल्या सभेत ज्या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे सर्व महाविद्यालयातील मंजूर प्रवेश क्षमतेनुसार प्रवेश पुर्ण झाले आहेत. फक्त अशा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता फक्त संलग्नित महाविद्यालयाकरिता मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा २० टक्याने वाढवून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

त्यानुषंगाने सुचित करण्यांत येते की, एम.एस.सी., एम.कॉम., एम.कॉम. (प्रोफेशनल) व एम.एस.डब्ल्यु. या चार अभ्यासक्रमांचे सर्व संलग्नीत महाविद्यालयातील प्रवेश पूर्ण झाले असल्याने या चार अभ्यासक्रमांची संलग्नीत महाविद्यालयात मंजूर असलेल्या प्रवेश क्षमतेच्या २० टक्याने प्रवेश क्षमता फक्त सत्र २०२०—२१ करिता वाढविण्यात आली असून या २० टक्के जास्तीच्या प्रवेशाकरिता विद्यापीठाद्वारे स्वतंत्र विशेष प्रवेश फेरी (Special round) राबविण्यात येणार असून या फेरीमध्ये ज्या विद्यार्थ्यांना उपरोक्त अभ्यासक्रमात आधीच प्रवेश मिळाला असेल अशा प्रवेशित विद्यार्थ्यांस समाविष्ठ होता येणार नाही याची सर्व संबधितांनी नोंद घ्यावी. त्याचप्रकारे ज्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त अभ्यासक्रमाकरिता विद्यापीठाच्या ऑनलाईन (http://www.rtmnu.university) या पोर्टलवर पूर्वीच नोंदणी केलेली आहे. परंतु त्यांना प्रवेश मिळालेला नाही. अशा विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे घोषित वेळापत्रकानुसार http://www.rtmnu.university या पोर्टलवर त्यांना विशेष प्रवेश फेरी (Special round) मध्ये सहभागी व्हायचे आहे किंवा नाही याबाबतचा पर्याय निवडणे आवश्यक राहील. जे विद्यार्थी विशेष प्रवेश फेरीमध्ये भाग घेण्यास इच्छुक राहतील अशा विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने नोंदणी फी रु. ३००/— जमा करावी लागणार आहे.

तसेच ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी उपरोक्त अभ्यासक्रमात प्रवेश मिळण्याकरिता विद्यापीठाच्या http://www.rtmnu.university या पोर्टलवर नोंदणी केलेली नाही. व कुठेही प्रवेश घेतलेला नाही अशा विद्यार्थ्यांना देखिल विशेष प्रवेश फेरीमध्ये (चमबपंस तवनदक) मध्ये सहभागी होता येणार असून त्यांना नव्याने http://www.rtmnu.university या पोर्टलवर विद्यापीठाने घोषित वेळापत्रकानुसार ऑनलाईन रु. ५००/— नोंदणी फी जमा करुन नोंदणी करावी लागणार आहे.

विद्यापीठाद्वारे विशेष प्रवेश फेरी (Special round) द्वारे वरीलप्रमाणे वाढविण्यात आलेल्या २० टक्के जागा या सर्व सामान्य प्राविण्य सुचितून (General merit) मेरिट नुसार भरण्यात येणार असून विशेष प्रवेश फेरीनंतर देखिल जागा रिक्त राहील्यास हया जागा विद्यापीठाद्वारे समुपदेशनाद्वारे (Counselling round) द्वारे भरण्यात येतील. विशेष प्रवेश फेरीचे व समुपदेशन फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या http://www.nagpuruniversity.ac.in व http://www.rtmnu.university या संकेतस्थळावर/पोर्टलवर प्रकाशित (घोषित) करण्यात आले आहे. करिता सर्व संबंधितांनी घोषित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार कार्यवाही घ्यावी. तसेच समुपदेशन फेरी दरम्यान प्रवेश घेण्याकरिता उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण मुळ कागदपत्रासह विद्यापीठाचे ग्राम गिता भवन, महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक परिसर नागपूर येथे नियोजित वेळी उपस्थित राहावे. जे विद्यार्थी नियोजित वेळी समुपदेशन फेरी (Counselling round) करिता निर्धारित स्थळी उपस्थित राहणार नाहीत व त्यामुळे त्यांना प्रवेश न मिळाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी त्या विद्यार्थ्यांची राहील याची कृपया नोंद घ्यावी.

(डॉ. रमण मदने)
उपकुलसचिव (अति.कार्य)
(महाविद्यालयीन विकास विभाग)